# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– ०२/११/२०१७

## १) इसमास चाकुने मारुन जखमी केले. :–

दिनांक १/११/२०१७ चे ०९.३० वा. चे दरम्यान यातील फिर्यादी सुनिल गोविंदा कांबळी वय ३५ वर्ष रा. कुडेगाव याचे वडील गोंविंदा कांबळी यांना आरोपीने '' नविन घर बांधण्याकरीता जागा पाहीजे '' या कारणावरुन भांडण करून थापड बक्यांनी मारहाण करीत असता फिर्यादीने आरोपीस '' तु माझ्या वडीलांना का मारतोस '' असे हटकले यावरून आरोपीने स्वत: कडील चाकुने फिर्यादीचे डाव्या हाताच्या भुजेवर मारुन जखमी केले. अशा फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखांदुर येथे कलम ३२४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

## २) घरातील नगदी व सोन्याच्या दागिन्याची चोरी. :–

दिनांक २२/१०/२०१७ ते ३१/१०/२०१७ चे दरम्यान यातील फिर्यादी अनिसा बेगम मोहम्मद निसार शेख वय ६२ वर्ष रा. गांधी चौक लाखांदुर हे कुटुंबासह घराला ताला लावुन बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने घराच्या मागील दाराचा कोंडा तोडुन घराच्या आत प्रवेश करुन घरात ठेवलेली टिणाची लोखंडी पेटी फोडुन पेटीत ठेवलेले १ **सोन्याची मनगटी दीड ग्रॅम , सोन्याची पांचाली अडीच ग्रॅम , सोन्याचा गोप अडीच ग्रॅम , सोन्याची अंगठी अडीच ग्रॅम , चांदीचा झुमका पाच ग्रॅम ,चांदीचे ०२ कंगन ०३ ग्रॅम ,चांदीचा कडा ०३ ग्रॅम, चांदीचे २ जोडवे ०५ ग्रॅम व नगदी १३००/–रु. व ७,०००/– रु. चिल्लर असा एकुण ४८,३००/–रूपयाचा** माल चोरुन नेला. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखांदुर येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. खंडाते, पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

## ३) क्षुल्लक कारणावरुन धारदार लोखंडी वस्तुने मारुन जखमी केले :–

दिनांक १/११/२०१७ चे १९.३० वा. चे दरम्यान यातील फिर्यादी मोरेश्वर लहानु टेंभर्णे वय ५६ वर्ष रा. गोसे खुर्द याचा आरोपी हा मुलगा असुन फिर्यादीने 'आरोपी मुलास वाही येथे पेशी आहे' तुझे नाव आहे असे सांगताच आरोपीने '' माझे नाव नसुन तु माझे नाव आहे असे का म्हणतोस? '' यावरुन फिर्यादीला शिविगाळ करुन तोंडावर बुक्की मारुन उजव्या हाताला चावा घेवुन कोणत्यातरी धारदार लोखंडी वस्तुने डोक्यावर मारुन जखमी केले. अशा फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पवनी येथे कलम ३२४,५०४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

## ४) मोटार सायकलच्या धडकेने एक इसम जखमी :–

दिनांक ३१/१०/२०१७ चे १३.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमी हरीदास मारोती खोब्रागडे वय ७० वर्ष रा. चोवा हा चौका मध्ये ऊभा असतांना त्यास धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेला. अशा फिर्यादी भारत रूपचंद वैद्य वय ५० वर्ष रा. चोवा याचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पो. स्टे. अडयाळ येथे कलम २७९,३३७ भा.दं.वि.सहकलम १८४,१३४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. सतदेवे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) झायलो कारची मोटार सायकलला धडक, दोन गंभिर जखमी :–**

दिनांक १६/१०/२०१७ चे १६.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी थानेश आनंदराव बारस्कर वय २६ वर्ष रा. भुगाव हा त्याचे हिरो होंडा मोटार सायकल क्र एमएम ३६ वाय ३९८९ नी सानगडी व भुगावला काका रूपेश जसीराम बारस्कर वय २१ वर्ष रा. भुगाव याला सोबत बसवुन जात असतांनी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील झायलो कार ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादी व फिर्यादीचे काकास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पो.स्टे. साकोली येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वि. सहकलम १८४,१३५(अ)(ब),१८७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान मृत्यु .:–**

दिनांक १/११/२०१७ चे ०२.४० वाजता दरम्यान यातील मृतक तेजराम गणु मेश्राम वय ६० वर्ष, रा. नेरी याने कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रू.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ०१/११/२०१७ चे २०.४० वाजता मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सर तर्फे फिर्यादी पो.शि. भालाधरे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**७) वृध्द इसमाचे प्रेत नदीचे पात्रात काठावर मिळुन आले. .:–**

दिनांक १/११/२०१७ चे १३.०० वाजता दरम्यान यातील मृतक सिताराम तुकाराम कावळे वय ६० वर्ष, रा. संताजी वार्ड भंडारा याचे प्रेत सिरसघाट शेतशिवार नदीचे पात्रात काठावर मृता अवस्थेत उभडया स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी सौ. प्रतिभा राजकुमार भुरे वय ३५ वर्ष, रा. सिरसघाट(पोलीस पाटील) यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**८) मोटर वाहन कायद्याखाली कारवाई**

दिनांक ०१/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटर वाहन कायद्याखाली ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १५ केसेस व इतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(पो.नि.एस.के.चव्हाण )
नियत्रण कक्ष अधीकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९८२३६४७०६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.